




Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!






संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : २६० वा | गुरुवार | दि. १९ डिसेंबर २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# हलवा है क्या?


# वृत्त छापले..म्हणे जीवाने मारतो!

## सोलापूरच्या कंत्राटदारावर गून्हा दाखल!

## जिल्हा सामान्य रुग्णालय भ्रष्टाचार प्रकरण!

जनसंचलन/बुलढाणा

कोरोना काळात जिल्हा सामान्य रुग्णालयात मॉड्युलर ओटी प्रकरणातील एका कंत्राटदार आरोपीने एका बड्या पत्रकाराला जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी आरोपीवर गुन्हा दाखल झाला आहे.सोलापूर येथील बबलू इनामदारअसे त्याचे नाव आहे. कोरोना १९ काळात जिल्हा सामान्य रुग्णालयात करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचे सिद्ध होऊनही अनेक दोषी मोकाट असून तपासयंत्रणाही ढिम्म झाल्यात. तत्कालीन निलंबित डॉ. सुभाष चव्हाण यांनी कोणत्या पत्राच्या आधारे सोलापूर येथील एन एल हेल्थकेअर कम्पणीला उर्वरित करोडो रुपये अदा केले याचा शोध घेऊन कंत्राटदाराविषयी वृत्तांकन केले असता,या कंत्राटदाराने थेट पत्रकाराला फोन करून धमकी दिली. धमक्यांना घाबरणार ते पत्रकार कसले? थेट आरोपीवरच मग गुन्हा दाखल झाला आहे. प्रकरण असे आहे की,बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील भ्रष्टाचार महाराष्ट्रात गाजत आहे. या भ्रष्ट प्रकरणातील अनेक दोषी अद्यापही मोकाट आहेत. या महाभ्रष्टाचारातील एका प्रकरणातील बबलू इनामदार या कंत्राटदाराला निलंबित डॉ.सुभाष चव्हाण यांनी कोविड १९ काळात बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय येथे कोविड काळातील वाढलेल्या रुग्णांची संख्या बघून रुग्णांना योग्य




उपचार मिळावा त्याकरिता मॉड्युलर ओटी करिता करोडो रुपयांचा निधी त्वरित उपलब्ध करून दिला होता. त्या काळापासून आजपर्यंत मॉड्युलर ओटी कार्यान्वित नसून संबंधित ठेकेदार एन एल हेल्थकेअर कम्पनी सोलापूर येथील कंत्राटदार बबलू इनामदार यास ८० टक्के अडव्हास रक्कम देऊन टाकली व उर्वरित २० टक्के रक्कम बुलढाणा निलंबित जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांनी करोडो रुपयांची रक्कम कोणतीही शहानिशा न करता मागील पत्र व्यवहारांचा रेफरन्स घेऊन रक्कम अदा करून टाकली आहे. कोविड १९ काळापासून तर आज पर्यंत मॉड्युलर ओटी कार्यान्वित नाही. तत्कालीन निलंबित जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण डॉक्टर नितीन तडस,भांडारपाल प्रकाश बोथे यांनी नियमबाह्य काम करून शासनाची फसवणूक केली आहे.परंतु ते निलंबित होऊन ही उजळ माथ्याने फिरत आहे.त्यांची चल अचल संपत्ती जप्त करून भ्रष्टाचारांना धडा शिकवण्याची मागणी जोर धरू लागली असून,सोलापूर येथील कंत्राटदार बबलू इनामदार याला धमकी दिल्या प्रकरणी आता जेरबंद होणार आहे. भ्रष्टाचार प्रकरणात भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे राहणार अकोला यांची चल- अचल संपत्ती सील करून जिल्हाधिकारी यांना पत्र देऊन ती प्रॉपर्टी लिलाव करावी व येणारा पैसा सर्व शासनाच्या तिजोरीत त्वरीत जमा करावा असा अहवाल विभागीय चौकशी समिती प्रमुख यांनी उपसंचालक अकोला डॉक्टर भंडारी यांना जानेवारी २०२४ ला दिला असून अद्याप पर्यंत उपसंचालक भंडारी अकोला यांनी कोणतीही कारवाई केलेली नाही.

# अवैध वाळू उत्खनन व वाहतूकबाबत तो शासन निर्णय पारित करा

## सामाजिक कार्यकर्ते खरात यांचे मुख्यमंत्री मंत्र्यांना निवेदन

जनसंचलन/ देऊळगाव राजा



राज्यभरात अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणात महसूल,पोलीस आणि परिवहन विभागाची संयुक्त जबाबदारी निश्चित करून शासनाच्या महसूल रुपी उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने उपरोक्त तीनही विभागाच्या संयुक्त मासिक बैठकी संदर्भात सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात यांच्या पाठपुराव्यानंतर शासनाने मंजूर केलेली मागणी विषयक तो शासन निर्णय हिवाळी अधिवेशनात पारित करा अशी मागणी श्री खरात यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा नदीपात्रासह राज्यभरात होणाऱ्या अवैध गौण खनिज, उत्खनन व वाहतूक संदर्भात केवळ महसूल विभागाच नव्हे तर पोलीस आणि परिवहन विभागाची जबाबदारी निश्चित झाली पाहिजे जेणेकरून शासनाच्या महसुलात भर पडेल आणि प्रशासनाच्या कारभारात पारदर्शकता येईल.या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा युवा सामाजिक पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते यांनी मंत्रालय स्तरावर महसूल, पोलीस आणि परिवहन विभागाची संयुक्त जबाबदारी निश्चित करावी तसेच जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तिन्ही विभागाची संयुक्त मासिक बैठक दर महिन्याला घेणे बंधनकारक करावे अशा स्वरूपाची मागणी लावून धरली होती. त्यांची ही मागणी लोकआयुक्त मुंबई यांच्या समक्ष सुरू असलेल्या १० जुनं २०२४ रोजीच्या सुनावणी दरम्यान मंजूर करण्यात आली होती व तसे निर्देश तिन्ही विभागाच्या सक्षम अधिकारी देण्यात आले होते. या आदेशाला सुमारे सहा महिन्याचा कालावधी पूर्ण होत असतानाही अद्याप पर्यंत जिल्हास्तरावर प्रत्यक्ष आदेशाची अंमलबजावणी झाली नाही. दरम्यान पोलीस विभाग मार्फत अद्याप पर्यंत कुठलेही कारवाई करण्यात आली नाही तसेच लोकायुक्त समोर हजर झाले नाही. महसुली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने राज्यासाठी महत्वपूर्ण असलेल्या याविषयी लोकायुक्त महोदय यांनी १० जुन व १० ऑक्टोबर २०२४ रोजी गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरण ही केवळ महसूल विभागाची जबाबदारी नसून त्यामध्ये प्रामुख्याने पोलीस आणि परिवहन विभागाची संयुक्तरित्या जबाबदारी निश्चित केली असल्याचे सांगितले. दरम्यान अवैध गौण खनिज बाबत तीनही विभागाची संयुक्त जबाबदारी निश्चित करण्यात आली असताना संबंधित विभागाचे उदासीन धोरण या आदेशाची अवहेलना करीत असल्याचे दिसून आले आहे. मुख्यमंत्री महोदय आणि राज्याचे मुख्य सचिव महोदय यांनी गौण खनिज संदर्भात तिन्ही विभागाची संयुक्त जबाबदारी निश्चित करून जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये संयुक्त मासिक बैठकीचे आयोजन करण्याचे संदर्भात शासन निर्णय पारित करावा अशी मागणी श्री खरात यांनी हिवाळी अधिवेशन नागपुर दरम्यान एका निवेदनाद्वारे केली आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# अल्पसंख्याक हक्क दिन उत्साहात संपन्न...

## स्वत:च्या हक्क रक्षणासाठी जागरुक असावे - निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे

**जनसंचलन/बुलढाणा**

शासन अल्पसंख्यांक समाजासाठी विविध योजना राबवित असून या योजनाचा लाभ अल्पसंख्यांक समाजातील सर्व नागरिकांना होण्यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे. यासाठी अल्पसंख्याकांनी शिक्षणाचे महत्व समजून स्वत:च्या हक्क रक्षणासाठी जागरुक असले पाहिजे. अल्पसंख्याकांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रशासनासह नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी आज येथे केले. संयुक्त राज्य संघटनेने १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तृत केला होता. त्याकरीता दरवर्षी १८ डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणुन सर्वत्र साजरा केला जातो. तसेच अल्पसंख्यांक समाजास त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्काची जाणीव व माहिती व्हावी याकरीता अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी देखील १८ डिसेंबर हा दिवस ङ्गअल्पसंख्यांक हक्क दिवसफ म्हणून आयोजित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाचे सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक कौस्तुभ हिवाळे, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक ज्योती हिवाळे, इंटरनॅशलन ह्युमन राईट कमिशनचे राज्याध्यक्ष एस.पी.हिवाळे, सामाजिक कार्यकर्त अरविंद सैतवाल, समुदायातील विविध संघटनांचे प्रतिनिधी, विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते. आपल्या संबोधनात डॉ. जयश्री ठाकरे म्हणाल्या की, सर्व अल्पसंख्याक समुदाय आपल्या हक्कांबाबत जागरुक राहून मुख्य प्रवाहात सामिल होतील त्यादृष्टीने आपण प्रयत्न केले पाहिजे. तसेच शासनाव्दारे अल्पसंख्याकांच्या समस्यांचे तातडीने निराकरण करुन त्यांच्या विकासासाठी राबवित असलेल्या योजना प्रत्यक्ष त्यांच्यापर्यंत पोहोचेल याकरीता प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. सहभागी वक्त्यांनी अल्पसंख्याक समुदायांच्या विकासासाठी शासनाने तयार केलेल्या योजना सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध माध्यमाचा वापर करुन प्रशासनाने तसेच अल्पसंख्याक समुदायातील सर्व घटकांनी मिळून प्रयत्न करावे. तसेच अल्पसंख्याकांनी आपले अधिकार जाणून आपला विकास व देशाप्रती कर्तव्य पुर्ण करावेत, असे मत मांडले. उर्दु ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थांनी देशभक्तीपर गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर अल्पसंख्याक हक्क दिनाचे महत्व, घटनात्मक अधिकाराबाबत विद्यार्थ्यांनी भाषन केले. यावेळी विविध स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे स्मृतिचिन्हे व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कृषी समृद्धी मल्टीपर्पज फाऊंडेशनचे अध्यक्ष महेंद्र सोभागे यांनी केले.

# एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये प्रवेशासाठी अर्ज स्विकारण्यास सुरुवात

**जनसंचलन/बुलढाणा**

इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी अर्ज स्विकारण्यास सुरुवात झाली आहे. प्रवेश परीक्षा ही दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. इच्छूकांनी आपले अर्ज दि. १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकामार्फत सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या परिक्षेकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचे कार्यक्षेत्रातील अकोला, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच सर्व शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षामध्ये ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीचे विद्यार्थी या स्पर्धा परिक्षेसाठी पात्र राहतील. या सर्व शाळेतील मुख्याध्यापक यांनी प्रवेश परिक्षेचे आवेदन पात्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेवून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला या कार्यालयाकडे सादर करावे. विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय किंवा अनुदानित आश्रम शाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचेकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. आवेदन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या वार्षिक उत्पन्नाचा तसेच पालकांचा किंवा विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला जोडण्यात यावा. परिक्षेचे ठिकाण व वेळ : प्रवेश परीक्षा दि.२३ फेब्रुवारी, २०२५ रोजी होणार असून इयत्ता ६ वी करिता सकाळी ११ ते १.०० या वेळेत व इयत्ता ७ वी ते ९ वी करिता सकाळी ११ ते २.०० या वेळेत होईल. ह्या परीक्षा शासकीय आश्रम शाळा, कोथळी ता. बार्शिटाकळी जि. अकोला व शासकीय आश्रम शाळा, घाटबोरी ता. मेहकर जि. बुलडाणा या ठिकाणी होणार आहे.

# कोतवालास मारहाण, रेतीमाफियास कारावास...


**जनसंचलन/बुलढाणा**

रेतीची अवैध वाहतूक ... करणारे ट्रॅक्टर पकडल्यानंतर कोतवालास मारहाण करणाऱ्या रेतीमाफीयास तीन महिन्याचा सश्रम कारावास आणि दोन हजार रुपयांचा वा दंड ठोठावण्यात आला. हा निर्णय १७ डिसेंबर रोजी जिल्हा न्यायाधीश व्ही. व्ही. मुगळीकर यांच्या न्यायालयाने दिला. पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ३० मार्च २०१९ रोजी दुपारी १२.३० वाजताच्या दरम्यान चिखली तालुक्यातील तलाठी दीपिका खरात व सहकारी मतदान केंद्र तपासणीसाठी जात होते. तालुक्यातील ऐनखेड फाटाजवळ आरोपी ट्रॅक्टर व टॉलीतून रेतीची अवैध वाहतूक करताना आढळला. त्यावेळी चालकाला रेतीबाबतचा परवाना विचारला असता त्यांचेकडे परवाना आढळून आला नाही. त्यावेळेस खरात यांच्या सोबत असलेले कोतवाल गजानन अंभोरे यांनी पुढे जावून ट्रॅक्टर थांबविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी आरोपी शेख फारूक शेख रब्बानी याने कोतवाल गजानन अंभोरे यांना मारहाण करीत ट्रॉलीमधील रेती तिथेच टाकून



पळ काढला. या प्रकरणी अमडापूर पोलिसांत दीपिका खरात यांच्या तक्रारीवरून आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला होता. सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी वकिल ॲड. आशिष केसाळे यांनी काम पाहिले. न्यायालयासमोर नोंदवलेल्या पुराव्या माध्यमातून फियादीने दिलेल्या पुरावा व ईतर प्रत्यक्ष दर्शी साक्षीदारांच्या साक्षीच्या न्यायालयाने आरोपी शेख फारूक शेख गणी (रा. अमडापुर, ता. चिखली) यास कलम ३५३ व ३३२ भा. दं. वी कायद्यानुसार ३ महीने सश्रम कारावास व २ हजार दंड ठोठावला

# क्रीडा महोत्सवात मेहकर नगर परिषद कर्मचाऱ्यांचे सुयश




**जनसंचलन/मेहकर**

जिल्हा पातळीवर नगरपरिषद कर्मचाऱ्यांसाठी क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विविध सामूहिक व वैयक्तिक क्रीडा प्रकारांमध्ये प्रथम क्रमांकाचे बक्षीस मेहकर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना मिळाले आहे. जिल्ह्यातील १३ नगरपंचायत व नगरपरिषदेमधील कर्मचाऱ्यांनी विविध क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग नोंदविला होता. त्याचा समारोप जिल्हा क्रीडा संकुल बुलढाणा येथे झाला. नगरपरिषद मेहकरने विविध स्पर्धात बक्षीस मिळवले. बॅडमिंटन सिंगल मध्ये संतोष राणे यांनी प्रथम क्रमांक, डबल मध्ये संतोष राणे व सुधीर सारोळकर यांनी प्रथम, महिला बॅडमिंट सिंगल मध्ये प्रियांका सुरवसे तर डबल मध्ये प्रियंका सुरवसे व प्रगती काळे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. १०० मीटर धावणे स्पर्धेत ऋषिकेश पंडित यांनी प्रथम क्रमांक मिळवला. इतर अनेक कर्मचाऱ्यांनी ३ किमी चालणे, ४०० मीटर रिले, बुद्धिबळ, कॅरम, गोळा फेक, भालाफेक, थाळीफेक आदी वैयक्तिक खेळामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविले आहेत. या सर्वांचा जिल्हा प्रशासनाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# ऑटो व दुचाकीचा अपघात, दोघे जखमी...

**जनसंचलन/ डोणगाव**

भरधाव ऑटो आणि दुचाकीचा अपघात झाल्याने दोन जखमी झाले ही घटना १७ डिसेंबर रोजी रात्री ७.३० वाजता डोणगाव ते मेहकर राज्य महामार्गोवर पेट्रोल पंप जवळ घडली डोणगाव कडून मेहकरकडे जाणारा ऑटो क्र. एमएच २८ आर २२६५ व डोणगावकडे येणारी दुचाकी क्र. एमएच २८ एबी ७०९७ मध्ये डोणगावजवळ अपघात झाला यामध्ये दुचाकीस्वार नितीन तेलकर रा. डोणगाव हा जखमी झाला व ऑटोमधील बबन मधुकर चनखोरे रा. बोरी ता. मेहकर हे जखमी झाले ऑटोमध्ये तिघे जण बसलेले होते किरकोळ जखमी यांना मेहकर येथे हलविण्यात आले आहे डोणगाव पोलीस स्टेशनचे सहायक फौजदार मंगेश खडसे, पोकॉ. पवन गाभणे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

# घरकुल योजनेत गरजूना प्राधान्य देण्याचा ठराव

**जनसंचलन/ साखरखेर्डा**



घरकुल योजनेच्या यादीत गरजूंना प्राधान्य देण्याचा ठराव लिंगा पांगरी काटे येथील ग्रामसभेत घेण्यात आला. गट ग्रामपंचायत लिंगा-पांगरी काटे येथे १६ डिसेंबर रोजी विशेष ग्रामसभा घेण्यात आली. सभेत पांगरी काटे येथील आतापर्यंत झालेल्या कामाचे वाचन करून झालेल्या कामावर खर्च याचा लेखाजोखा ग्रामपंचायत सचिव म्हस्के यांनी जनतेसमोर मांडला. प्रत्येक विकासकामे व त्यावर होणारा खर्च निधी सर्वसामान्यांना समजेल यासाठी सचिन काटे यांनी गावांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक काम हे सूचना फलकावर लावण्यात यावे, प्रत्येक कामावर होणारा खर्च किती आहे, याची माहिती फलकावर लावण्यात यावी, अशी मागणी केली. त्यास इतरांनी समर्थन दिले. सभेला ग्रामस्थ मोठ्यासंख्येने हजर होते.

# अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक -प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

## नागपूर प्रेस क्लब येथे पत्रकारांसाठी विशेष व्याख्यान...






**वृत्तसंस्था /नागपूर**

माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच ङ्गएआयफ ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणा-या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता ङ्गएआयफ च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले. नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने ङ्गआर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझमम (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते. श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक-या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक-या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला. आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य -असत्य या परिभाषेत सावध होत ङ्गएआयफ ला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणा-या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रीम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआय चा वापर होणार नाही, यासाठी एआय ची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धमेंद्र झोरे, भुपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

# खाकी वर्दीला फोडला घाम!

## आमदार गायकवाड यांच्या लक्षवेधीने अंगात भरलिया हुडीहुडी -म्हणालेत..६ महिन्यांमध्ये ३ जातीय दंगली!

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्यामध्ये अनेक जातीय दंगली,गोमातेची तस्करी करून कत्तल,अवैध गुटखा, सर्रास अवैध धंदे, हेल्मेट सक्ती, अल्पवयीन मुली बेपत्ता, यासह विविध अनुचित प्रकार जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या दुर्लक्षामुळे होत असल्याचा आरोप आमदार संजय गायकवाड यांनी हिवाळी अधिवेशनात उपस्थित करून खाकीला चांगलाच घाम फोडला. आज १८ डिसेंबर रोजी महाराष्ट्र राज्याचे हिवाळी अधिवेशनात दरम्यान नागपूर येथे महत्त्वपूर्ण लक्षवेधी उपस्थित करताना आमदार संजय गायकवाड यांनी बुलढाणा मतदारसंघातील तसेच शहरातील विविध महत्त्वपूर्ण विषयावर सभागृहामध्ये प्रश्न उपस्थित केले. कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात प्रश्न उपस्थित करताना गायकवाड यांनी सांगितले की,सध्या कार्यरत असलेल्या पोलीस अधीक्षकांच्या कारकिर्दीमध्ये बुलढाणा जिल्ह्यामध्ये मागील ०६ महिन्यांमध्ये तीन जातीय दंगली झाल्या,आतापर्यंत लाखोंच्या संख्येने मोटरसायकल चोरी गेल्या, परंतु त्यांचा देखील पत्ता लागत नाही,त्यांची दखल ही पोलीस स्टेशनला घेतले जात नाही, घरफोड्या,चोऱ्या, वाटमाऱ्यांची संख्या ही हजारांच्यावर गेलेली आहे, अवैध दारू तसेच गावठी दारूचे प्रमाण अत्यंत मोठ्या प्रमाणामध्ये सुरू आहे, तसेच मतदारसंघामध्ये भाजी पाल्याप्रमाणे वरली तसेच चकऱ्यांची दुकाने सुरू आहेत . ज्या गोमातेला आपण राजमातेचा दर्जा दिला तिची सर्रास हत्या सुरू आहे तसेच तिची तस्करी सुरू आहे. मध्यप्रदेश मधून येणारा अवैध गुटखा तसेच दारू ही सर्रासपणे शहरातील तसेच मतदारसंघातील पानटपऱ्यामध्ये लाखो रुपयांचे हप्ते देऊन विकल्या जातो. हजारोंच्या संख्येने मतदारसंघातील अल्पवयीन मुली या बेपत्ता झाल्या परंतु पोलीस प्रशासनाला त्या शोधण्यात देखील अपयश आलेले आहे. तीन वर्षांपूर्वी आमदार गायकवाड यांच्या घरासमोरील गाडीला समाजकंटकांनी पेटवून दिले होते त्याचा शोध देखील आतापर्यंत पोलिस प्रशासनाला लावता आला नाही. वाहतूक पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे अनेक बळी आपण जाताना बघत आहे



हेल्मेट सक्ती असूनही हेल्मेट सक्ती करताना कोणीही दिसत नाही आणि त्यामुळे अनेक बळी हे दररोजचे जात आहेत. जुगार आणि अवैध धंदे हे सर्रासपणे पोलीस अधीक्षकांच्या समोर सुरू असताना देखील त्यावर कोणतीही कारवाई होत नाही कारण सर्वांचे लक्ष हे फक्त वसुलीवर आहे, परराज्यातून येणारे बटन नावाचे कॅप्सूल, गांजा, ड्रग्स,बॉण्ड हा नशा करून अल्पवयीन मुलं इतके बेधुंद होतात की त्यांच्याकडून एखादा गंभीर गुन्हा जरी झाला तरी त्यांना कळत नाही, त्यामुळे यावर देखील कोणताही बंधन घातले गेलेले नाही. या औचित्याच्या मुद्द्यावर प्रश्न उपस्थित करून या गैरप्रकाराला आळा घालण्याकरता शासन लवकरात लवकर कारवाई करणार आहे का असा महत्त्वपूर्ण मुद्दा यावेळी आमदार गायकवाड यांनी सभागृहामध्ये उपस्थित केला.

# वन्यप्राण्यांच्या संदर्भात शासन गंभीर नाही का? -इथे रोज अपघात जातात वन्यजीव !

जनसंचलन/ लोणार




वन्यजीव निसर्ग चक्रातील घटक असून त्यांचे जर रोजच जीव जात असतील तर हा गंभीर प्रश्न आहे.हा प्रश्न हिवाळी अधिवेशनात का उठत नाही? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. जगप्रसिद्ध लोणार सरोवराच्या काठावरून मंठा व संभाजीनगर असे दोन हायवे जोरात चालू असतात अनेक वाहने या रोड वरून भरधाव वेगाने वाहत असतात हे रस्ते सरोवराच्या अगदी लागून गेलेले आहेत त्यामुळे सरोवरात धोका निर्माण झाला आहे. सरोवराच्या पूर्वेकडील भाग ढासळत आहे. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. माणसाच्या अस्तित्वासाठी आणि निसर्गाच्या संतुलनासाठी वन्यप्राण्यांची दिवसेंदिवस घटत जाणारी संख्या ही एक गंभीर समस्या आहे. स्वार्थी वृत्तीची माणसं वन्यप्राण्यांच्या जीवावर उठली आहेत. त्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील जैवविविधता अनेक संकटाशी सामोरे जात आहे. बुलढाणा जिल्ह्यातही वन्य प्राण्यासह पक्ष्यांच्या रस्ता अपघाताचे प्रमाण अधिक आहे व यात लोणार तालुक्यात सर्वात जास्त या घटना होत आहेत. त्यासाठी हे रस्ते बायपास होणे गरजेचे आहे. मी लोणारकर टीम सतत वन्यप्राण्यांच्या व पक्ष्यांच्या तसेच सरोवराच्या संवर्धनासाठी अग्रेसर असते पण बऱ्याच वेळा प्राण्यांचा जीव वाचवण्यात यश येत नाही. भौगोलिक परिस्थिती प्रमाणे रस्त्याचे जाळे सर्वत्र पसरलेले आहे. नेहमी स्थलांतर करणारे प्राणी एकपेक्षा अधिक अधिवासाचा वापर करतात. वन्यजीवांना त्यांच्या हंगामी काळात जास्त प्रमाणात मार्गक्रम करावा लागतो. भरधाव वेगात सुटणाऱ्या वाहनांच्या अपघातात वन्यप्राणी आपला जीव कायमचा गमवून बसतात. दरवर्षी लाखोपेक्षा जास्त प्राण्याचा मृत्यू होतो. लवकरात लवकर सरोवराजवळ रस्त्यांना बायपास व्हावा ही मी लोणारकर टीम ची मागणी लवकर पूर्ण व्हावी वन्यजीव वाचावे.. कारण ही गांभीर्याने घेणारी बाब आहे.

# मेहकर-डोणगाव रोडवर भीषण अपघात

## स्कूटी-आयशरच्या धडकेत तरुणीचा जागीच मृत्यू!

जनसंचलन/मेहकर



मेहकर ते डोणगाव रोडवरील लांडेवाडी फाट्याजवळ १८ डिसेंबर रोजी सकाळी ८:३० वाजता स्कूटी आणि आयशर ट्रकच्या जोरदार धडकेत एका तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, मेहकरहून येणाऱ्या स्कूटीला नागपूरकडून मेहकरकडे जाणाऱ्या आयशर (क्र. ०४ ०८६७) ने धडक दिली. या भीषण अपघातात स्कूटीस्वार तरुणी वैष्णवी किरण चंदनशिवे (राहणार अण्णा भाऊ साठे नगर, मेहकर) हिच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. वैष्णवी ग्रामीण कुटा फायनान्समध्ये काम करत होती आणि सकाळी वसुलीसाठी जात असल्याचे समजते. अपघाताची माहिती मिळताच डोणगाव पोलीस स्टेशनचे वाहतूक पोलीस हर्ष सहगल आणि पोलीस मित्र रहीम खान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. आयशर चालकाला ताब्यात घेऊन वाहन पोलीस स्टेशनला जमा करण्यात आले आहे. वृत्त लिहीपर्यंत कोणताही गुन्हा नोंदवण्यात आलेला नव्हता.

# शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अजीम खान, उपाध्यक्षपदी गणेश बोर्डे यांची बहुमताने निवड!

जनसंचलन/ चिखली

श्री. राजाभाऊ बोंद्रे नगर परिषद माध्यमिक व उर्दू उच्च माध्यमिक विद्यालय, चिखली येथील शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडणुकीत अध्यक्षपदी अजीम खान राजदर खान यांची तर उपाध्यक्षपदी गणेश रमेश बोर्डे यांची बहुमताने निवड झाली आहे. अध्यक्षपदाच्या निवडणुकीत अजीम खान यांनी ६ मते मिळवून विजय मिळवला, तर महिला उमेदवाराला ४ मते आणि सलीम परवेज यांना १ मत मिळाले. चुरशीच्या निवडणुकीत वर्ग ६ ते ८ मधील पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. नवीन शाळा व्यवस्थापन समितीच्या इतर सदस्यांमध्ये सलीम परवेज खान अ. सत्तार, शेख जावेद शेख करामत, रईसा बी मजीद खान, असामा परवीन शेख सलीम, नजमा परवीन दिलषाद अली, रुबीना बी सैय्यद शगीर, रमेश भुजंगराव अंभोरे, वर्षा गणेश बोर्डे, आणि लक्ष्मी देवेंद्र भोंडे यांचा समावेश आहे.




शाळा व्यवस्थापनासाठी नव्या समितीकडून सकारात्मक बदलांची अपेक्षा आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958